# महाराष्ट्र विधानसभा
## पत्रक भाग-दोन
गुरुवार, दिनांक ४ जुलै, २०२४/ आषाढ १३, १९४६ (शके)

७१.

अध्यक्ष : शुक्रवार, दिनांक ५ जुलै,२०२४ रोजी अशासकीय कामकाज (ठराव) घेण्यात येणार आहेत. अशासकीय ठरावांचा प्राथम्यक्रम बॅलटद्वारे निश्चित करण्यात आला असून त्याबाबतची माहिती सर्व सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे देण्यात आली आहे. बॅलटद्वारा काढण्यात आलेल्या ५ अशासकीय ठरावांमधुन ३ अशासकीय ठराव चर्चेकरिता घेण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहेत. अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ अशासकीय विधेयके व ठराव समितीने निश्चित करावयाचा असतो. तथापि, सध्या अशासकीय विधेयके व ठराव समिती नव्याने घटीत करण्यात येत असल्याने मी शुक्रवार, दिनांक ५ जुलै,२०२४ रोजी अशासकीय कामकाजासाठी उपलब्ध असलेल्या १५० मिनिटांच्या वेळेपैकी १५ मिनिटांचा वेळ पुर:स्थापनार्थ असलेल्या विधेयकांना व उर्वरित १३५ मिनिटांचा वेळ चर्चेकरिता घेण्यात येणाऱ्या खालील नमूद ठरावांना देत आहे.

| | | |
|---|---|---|
| (१) | श्री.संग्राम थोपटे, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक - ५३ | ४५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| (२) | डॉ.विश्वजित कदम, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक - ११७ | ४५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| (३) | श्री. विकास ठाकरे, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक -९७ | ४५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |

वरीलपैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या ठरावाला देण्यात येईल.

विधान भवन,
मुंबई
दिनांक : ४ जुलै, २०२४

जितेंद्र भोळे
सचिव-१ (कार्यभार)
महाराष्ट्र विधानसभा

याची प्रत :
१) महाराष्ट्र विधासभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
४) संगणक कक्ष.